International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 4 | May - 2015 Available online at www.isrj.org

# " चीनच्या परराष्ट्र धोरणातील स्थित्यंतरे ''

भगवान माने
राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Short Profile :
Mane Bhagwan is work at Department of Political Science in Shivaji University, Kolhapur.



## प्रस्तावना :

दुसऱ्या महायुध्दानंतर परराष्ट्रधोरण ही स्वतंत्र आणि संघटित ज्ञानशाखा म्हणून ओळखली जाते. प्राचीन भारतात परराष्ट्र धोरण आणि राजनयाची माहिती मिळते. परंतु भारतीय राजकारणात परराष्ट्रधोरण आणि राजनय हा विषय दुर्लक्षित राहिलेला आहे, भारत वैश्विक संबंधाऐवजी (Global Relations) स्थानिक (Local Relations) संबंधामध्ये अधिक गुंतलेला आहे. परराष्ट्र धोरण हा विषय केवळ राज्यशास्त्राशी संबंधीत नसून त्याचा आंतर-विद्याशाखांशी संबंध जोडला जातो. नव्वदीच्या दशकानंतर जागतिकिकरणाचा वैश्विक राजकारणावर मोठा प्रभाव पडलेला आहे. जागतिकीरण, खाजगीकरण आणि उदारीकरणामुळे (GPL) विविध देशांच्या परराष्ट्र धोरणात अमूलाग्र बदल झाले आहेत. त्यामध्ये दक्षिण अशियातील भारत आणि चीन ही दोन्ही राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणातही स्थित्यंतरे होत आहेत. भारत आणि चीन ह्या दक्षिण आशियातील दोन महासत्ता आहेत. परंतु भिन्न राजकिय विचारप्रणाली, आणि सीमावादाच्या प्रश्नांमुळे भारत आणि चीनमध्ये संघर्ष सुरू आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंनी पंचशील तत्वांचा परराष्ट्र धोरणात स्विकार केला. हिंदी चीनी भाई-भाई अशी घोषणा केली, परंतु १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. भारताच्या काही प्रदेशात घुसखोरी केली. आणि अद्यापही चीनकडून भारतावरील आक्रमण थांबलेले नाही.

वास्तविक जागतिकीकरणानंतर चीनने भारताशी व्यापारी आणि राजनैतिक संबंध प्रस्थापित केले आहेत. दक्षिण आशियातील भारत आणि चीन या देशांनी समकालीन वैश्वीक राजकारणातील बदलते प्रवाह पाहतायुध्दाऐवजी आर्थिक देवाण-घेवाण, परस्पर सहकार्य नैतीकता आणि मानवी विकासावर अधिक भर देणे गरजेचे आहे, ही संशोधनाची समस्या आहे. १९४२ चे पहिले महायुध्द, १९४२ चे दुसरे महायुध्द, अमेरिका आणि रशियातील शीतयुध्द, वैश्वीक स्तरावर विविध देशातील युध्दे, मानवी हिंसाचार, युध्दामध्ये होणारी वित्त आणि मानवीहानीचा विचार करता कोणत्याही देशाला युध्द परवडणारे नाही,

Article Indexed in :
DOAJ Google Scholar DRJI
BASE EBSCO Open J-Gate

युध्द नको बुध्द हवा, अशी वैश्विक भावना निर्माण झाली आहे. दक्षिण आशियातील भारत आणि चीन दोन महासत्ता आहेत. भारत लोकशाहीवादी राष्ट्र, आणि चीन साम्यवादी राष्ट्र आहे, भारत आणि चीनमध्ये लोकसंख्यावाढ दहशतवाद इत्यादी समस्या समान आहेत. त्यांचे निवारण करणे आवश्यक आहे चीनचे साम्राज्य विस्ताराचे धोरण, पाकिस्तानच्या दशहतवाद्यांना मदत, बेकायदेशीर लष्करीतळ उभारणे इत्यादीमुळे दक्षिण आशियाच्या प्रगती आणि विकासामध्ये अडथळा निर्माण होत आहे. म्हणुन चीन आणि भारताने वैश्वाक स्तरावरील स्थित्यंतरांचा बोध घेऊन शेजारच्या राष्ट्राशी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करून आर्थिक, सांस्कृतिक विकास करावा, मानवी हक्कांचे संरक्षण करावे, परराष्ट्र धोरण लवचिक करावे यासाठी शोधनिबंधाची आवश्यकता आहे.

## भारताच्या परराष्ट्र धोरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

बुध्दकाळात परराष्ट्रधोरण आणि राज्या-राज्यांमधील संवादावर (dialogue) अधिक भर होता. कौटिल्याने अर्थशास्त्र ग्रंथात परराष्ट्र धोरणा संबंधीचे प्रारूप स्पष्ट केले आहे आणि सध्या जगातील अनेक देशांनी कौटिलयाच्या परराष्ट्र नितीचा अंगिकार केला आहे. दीड हजार वर्षापूर्वी फाड्यान चीनी प्रवाशाने भारतातील व्यापार, उद्योग, व्यवसाय, बाजारपेठासंबंधी माहिती प्रवास वर्णनात दिली आहे मुघलकाळात स्वातंत्रपूर्व काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या १९३६ च्या हरिपूर काँग्रेस अधिवेशनात भारताच्या परराष्ट्र धोरणाचे उद्दीष्ट स्प होते. हरिपूर काँग्रेसच्या ठरावानुसार भारतीय लोक शेजारी राष्ट्रांशी आणि इतर राष्ट्रांशी मैत्रीपूणे आणि शांततामय संबंध ठेवू इच्छितात. कायमची जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी साम्राज्यवाद आणि एका मानवी समुहाकडून दुसऱ्या मानवी समूहाची होणारी पिळवणूक थांबविणे आवश्यक आहे, ''२ यावरून असे स्पष्ट होते. भारताने शेजारील राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध आणि सहकार्य यावर अधिक भर दिलेला आहे.

## पंडित जवाहरलाल नेहरूंचा परराष्ट्र धोरणावरील प्रभावः

१९५०-१९६२ चा कालखंड भारतीय परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने महत्वाचा मानला जातो. दुसऱ्या महायुध्दानंतर जगाची दोन गटात झालेली विभागणी आणि सत्ता संघर्षामुळे निर्माण झालेल्या जागतिक संघर्षाच्या काळात पंडित जवाहरलाल नेहरूंनी घेतलेली भूमिका महत्वाची ठरली होती. लाल बहादुर शास्त्रींनी १९६२-१९६६ या काळात पंडित जवाहरलाल नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे प्रारूप अंमलात आणले होते. श्रीमती इंदिरा गांधी (१९६६-१९८४) या काळातील परराष्ट्र धोरणावरही नेहरूंच्या प्रारूपाचा प्रभाव होता. श्रीमती इंदिरा गांधीनी १९७१ मध्ये बांगला देशाला स्वातंत्र मिळवून दिले, आणि बंदूकीच्या गोळी ऐवजी मतदानाने (Ballot) परिवर्तन होते हा संदेश दिला. पाकिस्तानच्या युध्दात भारताचे सामर्थ्य इंदिरा गांधी यांनी दाखविले. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या (१९८४-१९९१) या कालखंडात नेहरू मॉडेल बाजूला फेकले गेले. जागतिकीकरणामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या परराष्ट्र धोरणाचा स्विकार करावा लागला. अलिप्ततावादा ऐवजी विविध राष्ट्रांशी आंतरराष्ट्रीय संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. त्यापुढील काळात पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव (१९९१-१९९६) पंतप्रधान, वाजपेयी, दैवेगोडा, इंद्रकुमार गुजराल (१९९६ ते १९९८) अटलबिहारी वाजपेयी (१९९८ ते २००४) आणि मनमोहन सिंग २००४-२००९ आणि २००९ ते २०१४ या पंतप्रधानाच्या कार्यकाळात आंतरराष्ट्रीय व्यापार, तंत्रज्ञान, खुली अर्थव्यवस्था परकीय गुंतवणुक या अनुषंगाने परराष्ट्र धोरणावर आधिक भर दिला होता. माजी पंतप्रधान वाजपेयी, राजीव गांधी यांनी चीनशी भेटी देऊन, राजनय, वाटाघाटी द्वारे, मैत्रीचे संबंध आर्थिक सहकार्य यासाठी प्रयत्न केले होते. १९४५ ते १९९० चा कालखंड शीत (Coldwar) युध्दाचा मानला जातो. नव्वदीनंतर नवीन वैश्विक रचना विकसित झाल्याने, भारतालाही आपल्या परराष्ट्र धोरणात अमूलाग्र बदल करावे लागले. या अनुषंगाने श्री. राजमोहन असे म्हणतात की, '' भारतात समजावादाकडून आधुनिक भांडवलशाहीकडे वाटचाल सुरू असुन परराष्ट्र धोरणात राजकिय

हितसंबंधाऐवजी आर्थिक हितसंबंधाना प्राधान्य, आदर्शवादा ऐवजी राष्ट्रीय हितसंबंधाला अधिक महत्व दिले जाते.'' यावरून असे स्पष्ट होते की, भारताच्या परराष्ट्र धोरणात स्थित्यंतरे घडत आहेत.

### भारत–चीन परराष्ट्र संबंध :

चीन हा भारताच्या शेजारील सर्वात मोठे साम्यवादी राष्ट्र म्हणुन ओळखले जाते. आणि भारत संसदीय लोकशाही आणि उदारमतवादाचा पुरस्कार करणारा देश म्हणून वैश्विक स्तरावर ओळखला जातो. चीनच्या परराष्ट्र धोरणातील स्थित्यंतरे पाहत असताना चीनची साम्यवादी राजकिय व्यवस्था आणि संरचनेचा विचार महत्वाचे ठरतो. भारत–चीन परराष्ट्र संबंध हा (ऋेो–झेश्रळींळली) भू–राजकारणाचा भाग आहे. एखाद्या भौगोलिक क्षेत्रावर मालकी हक्क प्रस्थापित करण्याचा संघर्ष म्हणुन भारत चीन परराष्ट्र संबंधाकडे पाहिले जाते.

### भारत चीन युध्द १९६२ :

चीनने १९६२ मध्ये भारतावर आक्रमण केल्यामुळे हिंदी–चीनी भाई–भाई घोषणा फोल ठरली. चीनच्या आक्रमणामुळे भारताने वास्तववादी परराष्ट्र धोरणाचा स्विकार करून संरक्षण सिध्दतेकडे आधिक लक्ष दिले. भारत–चीन युध्दाला अर्धशतकाहून अधिक काळ लोटला. तरी भारताकडून चीनला सज्जड दम दिला नाही. यावरून असे स्पष्ट होते की, परराष्ट्र धोरणांची अंमलबजावणी करताना भारताचा इतर राष्ट्रांवर किती प्रभाव पडतो, आणि इतर राष्ट्रांनी टाकलेला प्रभाव आम्ही किती थांबवू शकतो, भारताचे इतर राष्ट्राकडून परराष्ट्र धोरणा संबंधी किती पालन केले जाते. याचा विचार करणे महत्वाचे ठरते, भारत आणि चीनची तुलना करता चीनचा आर्थिक विकास दर भारतापेक्षा जास्त आहे, चीनकडे जागतिकीकरणातील स्पर्धेत टिकून राहण्याची सर्व कौशल्य आहेत. मात्र भारताने वीसवर्षाहून आधिक काळ जागतिकरणाचा स्विकार केला तरी स्पर्धेत टिकण्याची किमान कौशल्य प्राप्त केली नाहीत.

भारत–चीन संघर्ष भौगोलिक सीमा आणि प्रदेशवादाचा आहे. तसेच चीनला अशियाखंडात महासत्ता निर्माण करावयाची आहे. अरूणाचल प्रदेश आणि लडाखमध्ये चीनची घुसेवारी सुरू आहे, हिमाचल प्रदेशामधील १४००० फुटावरील किन्नोर भागात भारतीय जमिनीवर कब्जा करण्याचा प्रयत्न सुरू आहे. आशिया आणि हिंदी महासागरात चीनने मोठया प्रमाणावर आपले लष्करी तळ उभे केले आहेत. चीनचे १९ राष्ट्रांशी सीमावाद होते. त्यापैकी १७ राष्ट्रांबरोबर असलेले वाद पूर्णपणे मिटविले, परंतु भारत आणि भूतानमधील सीमावाद अद्यापही सोडविला नाही.३

### चीनची आर्थिक घुसेरवोरी :

भारतात चीनकडून मोठ्या प्रमाणावर आयात केली जाते, परंतु भारताकडून निर्यात कमी होते. त्यामुळे भारतीय उद्योगधंदे बंद पडत आहेत, रूपयाचे मूल्य घसरून वित्तीय तुटीमध्ये वाढ होत आहे. भारतीय व्यापारी चीनकडून स्वस्तात वस्तू खरेदी करतात, त्याचा परिणाम भारतातील उत्पादनावर होतो. रक्षाबंधन गणेशोत्सव आणि दिपावलीमध्ये १८०० कोटीचा नफा चीनने मिळविला आहे. म्हणून चीनच्या बाजार पेठेला रोखण्यासाठी भारताने आपला व्यापार वाढवून स्वदेशी प्रभावी बाजारपेठ निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

भारत आणि चीन परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करता, दोन्हीही देशांच्या परराष्ट्र धोरणात स्थित्यंतरे घडत आहेत. आज भारतापुढे आर्थिक भागीदारी करण्याचे मोठे आव्हान उभे आहे. भारताने चीनकडुन आर्थिक मदतीच्या अपेक्षा केल्या असल्या तरी ज्याप्रमाणे भारत चीन मधील मॅकमोहन रेषा फार स्पष्ट नाही. तसेच चीनचे परराष्ट्र धोरणही स्पष्ट नाही. याचा भारताने बोध घेतला पाहिजे.

### आर्थिक भागीदारी करा आणि राजकिय प्रश्न सोडवा :

वैश्विक स्तरावर जागतिकीरणामुळे विकसित, विकसनशील आणि अप्रगत देशांपुढे आर्थिक परस्परावलांबित्वाचा कळीचा प्रश्न उभा आहे. त्यामुळे जगातील विविध राष्ट्रांची युध्दाची भाषा मागे पडून आर्थिक भागीदारीसाठी प्रयत्न सुरू आहे. चीनमध्ये साम्यवादी राजकिय व्यवस्था आहे. तरी सुध्दा जागतिकीकरणानंतर चीनच्या परराष्ट्र धोरणामध्ये स्थित्यंतरे घडत आहेत.

### चीनच्या राष्ट्राध्यक्षांचा भारत दौरा आणि आर्थिक करार :

चीनचे पंतप्रधान जिनपींग यांनी दि. १८ ते २२ सप्टेंबर २०१४ रोजी भारत दौऱ्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी केलेले आर्थिक करार चीनच्या परराष्ट्र धोरणातील स्थित्यंतर आहे. राष्ट्राध्यक्ष झिनपिंग आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १) चीनची विकास बँक आणि गुजरात सरकारचा औद्योगिक विस्तार ब्युरो यांच्यात इंडस्ट्रियल पार्क उभारणे. २) चीनमधील गुआंगझू शहर आणि अहमदाबाद शहर सिस्टर सिटी म्हणून विकसित करणे. ३) गुजरात सरकार आणि चीनमधील गुआंडुंग प्रांत यामधील करार असे तीन महत्वाचे करार आणि राष्ट्राध्यक्ष झिनपिंग यांनी भारतात मोठया प्रमाणात गुंतवणुक करण्याची इच्छाही व्यक्त केली आहे. जागतिकीकरणानंतर चीनचे राष्ट्राध्यक्ष जियांग झेमिन यांनी १९९६ मध्ये भारताला भेट दिली होती. आणि २००६ मध्ये हु जिंताओ, २०१४ मध्ये राष्ट्राध्यक्ष झिनपिंग यांची भारत भेट आणि भारताशी केलेले करार हे चीन आणि भारताच्या परराष्ट्र संबंधातील स्थित्यंतरे आहेत.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींची भारत–चीन परराष्ट्र धोरणातील चाणक्य निती :

पंतप्रधान नरेंद्र मोदीनी सत्ताग्रहण केल्यानंतर म्हणजे ऑगस्ट २०१४ पासुन परराष्ट्र संबंधावर आधिक लक्ष केंद्रीत केले आहे. शेजारच्या देशांना भेटी देवून परराष्ट्रसंबंध अधिक दृढ करीत आहेत. चीनशी एका बाजूला मैत्री करीत आहेत. आणि जपान दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी चीनवर अप्रत्यक्षपणे केलेली टिका बरेच काही सांगून जाते. जपान दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी असे म्हणाले की, आता अठराव्या शतकाचे दिवस गेलेले आहेत, त्याकाळी आक्रमक राष्ट्र आपले साम्राज्य वाढविण्यासाठी दुसऱ्यांवर आक्रमणे करायची ही आक्रमणे जमिनी आणि सागरी मार्गाने होत असत. आता अशा प्रकारच्या गोष्टी होऊ नयेत ५ यावरून असे असे स्पष्ट होते की, लडाख आणि अरूणाचल प्रदेशमधील चीनची घुसेखोरी, दक्षिणपूर्व आशियातील देशांच्या बेटावर आणि जपानी बेटावरील हल्ले या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदींनी चीनला इशारा दिला आहे. याकडे दुर्लक्ष करता येत नाही.

### वन इंडिया वन चायना :

चीनच्या पंतप्रधान वन चायना पॉलिसी भारताने मान्य करावी असे म्हटले, त्याला भारताच्या परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनीही चीनने सुध्दा वन इंडिया पॉलिसी मान्य करावी असे प्रत्युत्तर दिले आहे. वन चायना पॉलिसी म्हणजे ज्या भागात चीन हक्क दाखवत आहे, ते तिबेट, हाँगकाँग, तैवान हे भाग चीनचे नसुनही या भागाला चीनचा भाग समजावा असा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनला रोखण्याचा पूर्ण बंदोबस्त केलेला आहे. हे त्याच्या डावपेचातून स्पष्ट होते. चीनच्या दादागिरीला आव्हान देण्यासाठी लष्कर प्रमुख जनरल व्ही.के. सिंगना मंत्रीमंडळात सामील करून, ईशान्य भारताचे प्रमुख केले आहे. भविष्यात चीनबरोबर युध्दकरण्यासाठी या दुर्गम भागात पायाभूत सुविधा निर्माण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे. तसेच अरूणाचल प्रदेशच्या किरेन रिजीकना गृहराज्यमंत्री पदाची जबाबदारी देऊन लडाखच्या

प्रदेशातील चीनची आक्रमणे रोखण्याचा प्रयत्न आहे. चीनच्या राष्ट्राध्यक्षांना भारत भेटीचे निमंत्रण देवून पंतप्रधान शपथविधीस मात्र चीनच्या विरोधात असणाऱ्या दलाई लामांना, तैवानच्या नेत्यांना उपस्थित ठेवणे यामध्ये नरेंद्र मोदींची चाणक्य नीती स्पष्ट होते, यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही.

## चीनसंबंधी जनसंघाची बदलती भूमिका :

१९६२ च्या चीन युध्दावेळी जनसंघाने सरकारवर मोठा दबाव आणून चीन विरोधी पावले उचलण्याची मागणी केली होती. चीनने तिबेटमध्ये हस्तक्षेप केल्यानंतर जनसंघाने पंचशील तत्वांची खिल्ली उडविली होती आणि चीनी दुतावासापुढे निदर्शनेही केली होती. ६ परंतु जागतिकीकरणानंतर जनसंघाच्या विचारातही स्थित्यंतरे घडतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

## निष्कर्ष :

- जागतिकीकरणानंतर देशोदेशींच्या परराष्ट्र धोरणात आमुलाग्र बदल झाले.
- युध्द, युध्दावरील खर्चापेक्षा, परकिय, गुंतवणुक, आर्थिक विकासासाठी चीनच्या परराष्ट्र धोरणामध्ये स्थित्यंतरे होत आहेत.
- चीनने दक्षिण आशियातील देश म्हणून भारतांशी परकिय गुंतवणुक आणि मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करणे गरजेचे आहे.

## संदर्भ सूची


१. Jain – Gopal lal – Rural Development pp. 2

२. पाटील वा. भा. : आंतरराष्ट्रीय संबंध, प्रशांत पब्लीकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती (२०११) पृ. ३६९.

३ देवळाणकर शैलेंद्र : आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक पब्लीशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद (२००४) पृ. ८

४ महाजन हेमंत (ब्रिगेडीयर) (निवृत्त) : चीनशी मैत्री, पण सावधानता हवीच, दैनिक पुढारी बहार पुरवणी दिनांक १४ सप्टेंबर २०१४.

५ उपरोक्त

६ कुमार पवन : भारत की विदेश नीति, ओमेगा पब्लीकेशन्स नई दिल्ली, ११००२ (२००६) पृ. २४४.